५३

मा.मुंबई उच्च न्यायालय प्रकरण प्राधान्य

क्र.अकआ/प्र-७/लेखनिक/सुविधा/
२००६-०७/२९५१
अपंग कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, ३ चर्चरोड, पुणे-१
दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०६१/२६१२६४७१
फॅक्स क्र. (०२०-२६१११५९०)
दिनांक - २० डिसेंबर, २००६.

# परिपत्रक

**विषय : दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या व्यक्ती लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परिक्षेसाठी लेखनिक पुरविणेबाबत..**

**संदर्भ :** १) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५

२) मा.मुंबई उच्च न्यायालय यांचे याचिका क्रमांक ७०/२००२ व १२९/२००३ प्रकरणात दिनांक १६ नोव्हेंबर, २००६ चे आदेश.

३) मुख्य आयुक्त, अपंग कल्याण, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे इंग्रजी पत्र क्र. २७-ओ.आर/ (३) / सीसीडी / ९९,दिनांक१४/०५/२००३ व क्र. २७ - ओ आर (३) / सीसीडी / ९९ / ६६०८, दिनांक ०२/०८/२०००.

४) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, परिपत्रक क्रमांक अपंग-२००६/प्र.क्र.१०५/सुधार-३, दिनांक १ डिसेंबर, २००६.

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील तरतूदीनूसार व मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्रमांक ७०/२००२ व १२९/२००३ संदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार स मंत्रालयीन प्रशासकीय विभागात त्यांच्या अखत्यारीत असलेला अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्या आदेश आहेत. सदर न्यायालयीन प्रकरणात असे दिसून आले आहे की, दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या व्यक्ती यांच्या पदभरतीकरीता ज्या पदांबाबत लेख परिक्षा घेण्यात येतील त्यावेळी त्यांना लेखनिकाचे सहाय्य घेण्यास परवानगी देण्यात येत नाही. यामुळे सदर व्यक्तींवर होणारा अन्याय टाळण्याच्या दृष्टीने सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना कळविण्यात येत आहे की, **अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील प्रकरण क्रमांक ५ व ६ मधील तरतूदीनूसार** दृष्टीहीन, अल्पदृष्टी आणि अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सीने बाधित झालेल्या व्यक्ती यांना लेखनिक उपलब्ध होण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

Scanned with OKEN Scanner

## शैक्षणिक परिक्षा / नेमणूकीसाठी घ्यावयाची परिक्षा यासाठी अपंग उमेदवारांना लेखनिकाची संवलत देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे.

१) अपंग उमेदवाराला परिक्षेसाठी लेखनिक हा परिक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने पुरवावा अथवा उमेदवाराने त्यांची इच्छा असल्यास स्वतः लेखनिकाची व्यवस्था करावी.

२) परिक्षेच्या वेळी पर्यवेक्षक आणि समवेक्षक यांनी योग्य ते पर्यवेक्षण करुन फसवणूकीचे किंवा तत्सम गैर प्रकार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३) प्रत्यक्ष अडचणी विचारात घेवून जर परिक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने लेखनिक पुरविला असल्यास, त्या प्राधिकाऱ्याने त्या लेखनिकाची सक्षमता तपासून निश्चित करुन घ्यावी.

४) परिक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने नेमणूकीच्या जाहिरातीमध्ये लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत सुस्पष्ट उल्लेख करावा.

५) उमेदवारांने परिक्षा आयोजित करणाऱ्या संबंधित यंत्रणेकडून लेखनिक घेणार आहे किंवा उमेदवार स्वतः लेखनिकाची व्यवस्था करणार आहे याचा अर्जात स्पष्ट उल्लेख करावा.

६) परिक्षा घेणाऱ्या यंत्रणेने परिक्षेच्या आवश्यकते प्रमाणे लेखनिकाची निवड करुन जिल्हा / विभागीय किंवा राज्य पातळीवर त्यांचे पॅनेल तयार करावे.

७) लेखनिकाचे पॅनेल हे आवश्यकते प्रमाणे त्या-त्या शाखेनुसार उदा. कला, वाणिज्य, विज्ञान, गणित, अभियांत्रिकी, वैद्यकीय इ. विषयाप्रमाणे करावे व फक्त पात्र आणि सक्षम लेखनिकाचा त्या पॅनेल मध्ये समावेश करावा.

८) शक्यतो परिक्षार्थी व लेखनिक हे एकाच शाखेचे असावेत.

९) उमेदवाराने स्वतःचा लेखनिक आणला असेल व जर तो लेखनिक आणि उमेदवार एकाच शाखेचे असतील तर तो लेखनिक उमेदवाराचे शैक्षणिक पात्रते पेक्षा एक पायरी / टप्पा कमी असावा. लेखनिक व उमेदवार भिन्न शाखेचे असल्यास त्यास ही अट लागू राहणार नाही.

१०) वर उल्लेखलेल्या शिवाय इतर कोणतेही निर्बंध लेखनिकाच्या निवडीवर असू नयेत.

११) काही अपवादात्मक परिस्थितीत परिक्षा सुरु होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार मुख्य समवेक्षक यांना राहतील.

१२) वेगवेगळया विषयाच्या पेपरसाठी एका पेक्षा अधिक लेखनिक वापरता येणार नाहीत. मात्र वरील ११ प्रमाणे अपवादात्मक परिस्थितीमध्ये बदल करण्याची परवानगी देण्यात येईल.

१३) लेखनिकाच्या मान्यता पत्रात खालील माहिती / तपशील नमूद करण्यात यावी.

१. परिक्षेसाठी उमेदवारास द्यावयाचा जादा वेळ

२. लेखनिकाच्या वेगळे / स्वतंत्र बसण्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था

३. प्रत्येक पेपरवर परिक्षेचा दिनांक, विषय याबरोबरच लेखनिकाचे नांव इ. तपशील छापण्यात येणार असल्याची माहिती.

४. अपवादात्मक परिस्थितीत लेखनिक बदलने आवश्यक असल्यास, त्यासाठी सक्षम प्राधिकारी यांचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक

Scanned with OKEN Scanner

१४) लेखनिकास अल्पोपहार घ्यावयाचा असल्यास त्यांनं तो परिक्षेच्या अगोदर किंवा नंतर घ्यावा.
१५) उमेदवार व लेखनिक यांना परिक्षेच्या वेळा बद्दल संपूर्ण माहिती देण्यात यावी.
१६) अतिरिक्त वेळ :-
१. लेखी परिक्षा एक तासाची असल्यास त्यासाठी किमान २० मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात यावा.
२. त्याच प्रमाणे परिक्षेचा कालावधी एक तासापेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त वेळ देताना प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ याप्रमाणे गणना करावी.
१७) परिक्षेच्या वेळी उमेदवारांचा गोंधळ व संभ्रम टाळण्यासाठी परिक्षा सुरु होण्याच्या पूर्वी योग्य अशी बैठक व्यवस्था करण्यात यावी.
१८) अपंगासाठी बसण्याची व्यवस्था शक्यतो तळ मजल्यावर करण्यात यावी.
१९) प्रश्न पत्रिकमधील मूळ प्रश्नांत दृष्य बाबी समाविष्ट असल्यास अथवा उमेदवाराकडून अशा दृष्य बाबींचा अर्थ लावणे किंवा दृष्य बाबींचे सादरीकरण करणे अपेक्षीत असल्यास अशा प्रश्नांचे ऐवजी पर्यायी प्रश्न पुरविण्यात यावेत. मात्र उमेदवारास उत्तर देण्यासाठी पर्यायी प्रश्नांचे ऐवजी मूळ प्रश्न निवडण्याची मुभा राहील.
२०) दृष्टीहीन उमदेवारांना उत्तर पत्रिका लिहीताना ब्रेलचा वापर करण्याची किंवा संगणक अथवा टंकलेखन यंत्र वापरण्याची मुभा राहील. ब्रेल लिपीमधील उत्तर पत्रिकेचे मुल्यांकन हे ब्रेल लिपी जाणणाऱ्या तज्ञ /परिक्षक यांच्याकडून करावे. शक्य झाल्यास प्रश्न पत्रिका ब्रेल लिपीमध्ये अथवा डिजिटल टेक्सट (Digital text) मध्ये पुरविण्यात यावी.
२१) एस.एस.सी / एच.एस.सी. परिक्षा मंडळे, सर्व विद्यापीठे, सर्व शैक्षणिक संस्था आणि सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी वरील सूचनांचे पालन करावे.

२०/१८/२००६

**आयुक्त, अपंग कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत : माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.**
१) मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
**प्रति : माहिती व कार्यवाहीस्तव.**
१) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
२) सर्व विभागीय आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
५) विभागीय समाज कल्याण अधिकारी (सर्व)
६) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकरी, मुंबई शहर / उपनगर.
७) सर्व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
८) सर्व सेवायोजन अधिकारी, जिल्हा सेवायोजन केंद्रे

Scanned with OKEN Scanner